
छोट्या किमची बाहुली

किम यारोशेव

मराठी: अश्विनी बर्वे



लहानग्या किमला कशाहीपेक्षा जास्त एक बाहुली हवी असते. कोणतीही साधीसुधी बाहुली नाही तर मॉस्कोमधील दुकानाच्या खिडकीत असलेली, निळ्या डोळ्यांची, पिकलेल्या गव्हाच्या रंगाचे केस असलेली ती खास बाहुलीच तिला हवी आहे.

पण तिच्या आईला वाटत नाही की, केवळ बाहुल्यांशी खेळल्याने मुलगी मोठी होऊन कणखर आणि धाडसी बनू शकेल.


१९३० च्या दशकातील रशियामध्ये घडणारी ही आनंददायक कथा सांगते की, किमचा दृढनिश्चय आणि कल्पकता तिच्या आईला कसे पटवून देते की, कधीकधी एखाद्याला हवी असलेली गोष्ट देणे हेच सर्वोत्तम असते.

छोट्या किमची बाहुली

किम यारोशेव

मराठी: अश्विनी बर्वे






एक लहान मुलगी होती जी एका मोठ्या शहरात आणि एका मोठ्या देशात राहत होती.

देशाचे नाव होते रशिया आणि शहराचे नाव होते मास्को, आणि लहान मुलीचे नाव होते किम.




जेव्हा तिचे पालक कामावरून घरी यायचे तेव्हा ते तिच्यासाठी काही ना काही घेऊनच यायचे. कधी ते पुस्तक आणायचे तर कधी खेळण्यासाठी ब्लॉक्स आणायचे. तर कधी वाळूत खेळण्यासाठी फावडे आणि छोटी सुपली आणायचे. पण छोट्या किमला संपूर्ण जगात काय पाहिजे होते तर बाहुली.

बागेत जाण्याच्या रस्त्यावर एक मोठे दुकान होते आणि त्या दुकानाच्या खिडकीत वेगवेगळ्या बाहुल्या ठेवलेल्या होत्या. ती त्यांच्याकडे एकटक बघत बसे, ती त्यांच्याकडे बघतच राही. तिथून बाजूला ती होऊच शकत नसे.






खिडकीमध्ये ठेवलेली एक बाहुली तर केवळ तिच्यासाठीच होती. ती चिनीमातीची केलेली होती. तिचे डोळे निळे होते आणि तिच्या वेण्या सोनेरी पिकलेल्या गव्हासारख्या होत्या.



पण किमचे पालक रशियातील इतर पालकांसारखेच विचार करत होते. त्यांच्या मते ज्या मुली लहानपणी बाहुलीशी खेळतात त्या शूर आणि मजबूत होत नाहीत.

म्हणून त्यांनी त्यांच्या छोट्या मुलीला बाहुली घेऊन दिली नव्हती.



पण छोट्या किमला मनापासून बाहुली हवीच होती. तशी तिला सापडली.

ती खरोखरची बाहुली नव्हती. तो एक सुप पिण्याचा चमचा होता. तिने त्या चमच्याला हातरुमाल घातला आणि त्याला ती नताशा म्हणू लागली. ती दिवसभर नताशा बरोबर खेळे, तिला गोष्टी सांगे. ती तिच्याबरोबरच जेवे आणि झोपे सुद्धा तिच्याबरोबरच.



किमची आई खूप नाराज झाली, ती किमला खूप बोलली आणि रागावली सुद्धा. पण ती किमला तिच्या बाहुलीपासून सुपाच्या चमच्यापासून, नताशापासून वेगळं करू शकली नाही.

म्हणून तिने किमसाठी नवीन खेळणी आणायचे ठरवले. जसे की एखादी रायफल. अर्थात खेळण्यातली बंदुक, पण सैनिक वापरतात अगदी तशीच, ते लाल चौकात कवायत करतांना वापरतात अगदी तशीच.





रायफलला लाकडी मूठ होती, जी थोडीशी तलवारीच्या आकाराची होती. छोट्या किमने रायफल आपल्या हृदयाशी धरली. तिने तिला एका उबदार ब्लँकेटमध्ये गुंडाळले आणि हळुवारपणे रशियन अंगाईगीत गात झोके देऊ लागली.

स्पी मालियुर्कामोय

प्रेक्रास्नीबारोश्की बारो...

तिची आई प्रचंड संतापली होती!





अचानक किमच्या आईच्या मनात एक गमतीशीर विचार आला. "एक मिनिट थांब," ती स्वतःशीच म्हणाली."माझा राग आणि माझी ओरडा सहन करूनही माझी छोटी किम तिच्या बाहुल्यांशी खेळतच राहते. यालाच म्हणतात ताकद. यालाच म्हणतात धाडस!" आणि मग तिची आई अभिमानाने हसली

चिमुकल्या किमच्या पुढच्या वाढदिवशी, ज्या दिवशी ती पाच वर्षांची झाली, तिच्या भेटवस्तूंमध्ये एक बाहुली होती!ती एक चिनीमातीची बाहुली होती. तिचे डोळे गडद निळे होते आणि तिच्या वेण्या पिकलेल्या गव्हाच्या रंगाच्या होत्या. आणि संपूर्ण जगात तिच्यापेक्षा जास्त आनंदी असलेली ती लहान मुलगी दुसरी कोणी नव्हती!



किम च्या पुढील वाढदिवस पण, जे दिवस तो पाच वर्ष च्या हुई त्याचा भेटवस्तू मध्ये एक बाहुली खूप होता!

ते एक साखर माती च्या बनी बाहुली होता.

त्याचा डोळे खोल निळा होते आणि पिकलेले गहू च्या रंग च्या केस एक वेणी मध्ये विणलेले होते.

आता लहान किम पूर्ण जग मध्ये सर्वांना आनंदी मुलगी होता!

शेवट

